■ महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार ■

■ बी. रघुनाथ पुरस्कार, औरंगाबाद ■

# अनादि अनंत

चंद्रकुमार नलगे

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B125

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर

**अनादि अनंत : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १७०/-

ज्याच्या ठायी
सामाजिक जाणिवेची व्यापक प्रगल्भता
आणि उपेक्षितांच्याविषयी आस्थेवाईकता आहे,
त्या - विजय चोरमारे या माझ्या विद्यार्थ्यास
आदरपूर्वक अर्पण

# अनुक्रम


१. एक जगणं ........................................................ ७

२. वाटसरू ........................................................ १८

३. विझलेला उत्सव ........................................................ २९

४. अनादि अनंत ........................................................ ४२

५. अनेक डाव भुताचे ........................................................ ५३

६. जनामनातले रंग ........................................................ ६५

७. मी एक मत्स्यगंधा ........................................................ ७३

८. निळं आभाळ लाल ठिपका........................................................ ८३

९. वाट मामाच्या गावची........................................................ ९७

१० याहून दंडकारण्य काही वेगळं असेल ?........................................................ ११०

११. झळाळ........................................................ १२१

१२. गोष्ट परतल्या सांजेची........................................................ १३०

१३. चंद्रबुडीची वेळ ........................................................ १४३

१४. नटरंग ........................................................ १५८

१५. सांजयोगी ........................................................ १६८


✦✦

# एक जगणं

खिडकी ही एक कल्पनाच मोठी रम्य आहे. घराला घरपण येतं ते खिडकीमुळे. ज्या घराला खिडकी नसेल ते घरच नसतं. त्या घराचा दम घुटतो. त्याचा श्वास कोंडून जातो. ते पार आक्रसून जातं. खिडकीमुळं घर गोंडस बनतं, चालतं- बोलतं वाटतं, जिवंत वाटतं. ज्या घराला खिडकी नसते ते घर मला आवडत नाही. कसंसंच वाटतं. ढिम्म नि आतल्या गाठीच्या माणसासारखं वाटतं. कुरूप असं जाणवतं. पायातल्या कुरूपासारखं, मनात सारखं ते ठसठसत असतं. बंदिस्त, चिरेबंदी वाडासुद्धा खिडकीविना ओका ओका वाटतो. त्यापेक्षा साध्या तडक्याचं, चंद्रमौळी घर खूप आवडतं. ते मनमोकळं असं वाटतं.

खिडकी म्हणजे आतल्या कोंदट हवेला वाट मोकळी करणारं, आतल्या अंधाराला महाप्रकाश देणारं दीपदान असतं. कढणाऱ्या मनांना मोकळा वारा मिळतो. कुढणाऱ्या अंत:करणाला उभ्या आकाशाचा निळेपणा

टवटवीत करतो. घुसमटल्या जिवाला बाहेरचा गंधवारा रसरशीतपणा देतो. आतल्या राकटपणाला मृदुमार्दव लाभतं.

खिडकीमुळेच आख्ख्या चराचराचं चैतन्यदायी संगीत ऐकायला मिळतं नि दबलेल्या कंठाला मुक्त साद घालावीशी वाटते. उघड्या जगातल्या रानपाखरांसारखी शीळ घालावी, आपणही मुक्तबंध व्हावं, निळ्या-निळ्या निळाईला भिडावं अन् त्यातच विरून जावं असं वाटतं.

झुलत्या बारीक तारेवरचा खंड्या पक्षी पाहावा... त्याची वेगवान सुळकी स्वत:च अनुभवावी. भिर्र जाणारा पोपटांचा थवा काळजात झेलावा. खाली, वर, आडव्या-तिडव्या झुळका घेणाऱ्या चिमण्यांचा तो देखणा नाच... हेवा हेवा वाटतो त्यांचा. त्या सरळ खिडकीत येतात. माझ्या श्वासाइतक्या अंतरावर सळकड्यांवर बसतात. तिथल्या तिथं बारीक पायउड्यांनी नाचतात. आत इतकी शहाणी माणसं बसली असताना त्या वेड्यासारख्या गिल्ला करतात. कित्येकदा तर माणसांच्या गिल्ल्यात त्यांचा एवढ्याशा जिवांचा गिल्ला ऐकूही येत नाही. माणसासारख्याच त्याही मुर्दाड बनतात.

सरळ सरळ वेडावणं दाखवत गिरक्या घेतात. त्यांच्या त्या लाजाळू गिरक्या शहाण्यांच्या डोक्यावरून जातात. पण कधी कधी त्याही रागावतात. माणसांना दटावतात. परंतु चिमण्यांच्या त्या दटावण्याला भ्याली तर ती माणसं कसली. बिचाऱ्या चिमण्याच हताश होतात. द्वाड माणसांची संगत नको म्हणून सुळकत भुर्रकन जातात.

कधी दृष्टीआड झाल्यासारख्या होतात. कधी अवतीभवतीच्या आवारात दंगा करत बसतात. कुणी हुसकावलं की, त्या वाकुल्या दाखवतील. डोंबाऱ्याच्या पोरासारखा तारेवरचा खेळ करून दाखवतील. कधी नजरा चुकवून वर्गातच आपली घरटी करतील. कधी कुणा प्राध्यापकाच्या जड तासाला बसता बसताच दंगा करतील. गंभीर झालेल्या पोरांच्या कळ्या खुलतील. भरकटणाऱ्या प्राध्यापकाला ताळ्यावर आणतील. माझ्या खिडकीत येऊन बसतील अन् मग साऱ्यांच्या चुगल्या माझ्याजवळ करतील. सरळ सरळ माझ्यासमोर बसतात. कुठं काय चाललंय चवीनं सांगतात. अर्थशास्त्राच्या तासाला जांभया देणाऱ्या पोरांच्या कानाजवळ फडफडून आलेल्या असतात. मराठीच्या तासाला कोमल काळजाच्या प्राध्यापिकेने कुजबुजणाऱ्या पोरांना डस्टर फेकून मारून लक्ष्यवेध



कसा केला, तेही डबडबल्या डोळ्यांनी कथन करतात. इतिहासाचे प्राध्यापकच इतिहासाच्या तासाला स्वत:च इतिहासाचा 'ध'चा 'मा' कसे करतात ती आपल्या घराण्याचाच इतिहास बिचाऱ्या पोरांच्या डोक्यावर कसा मारतात, त्यामुळे पुढील नऊ लाख बांगड्यांचे आधारस्तंभ कसे आताच गोंधळून गेलेत त्याचं रामायण सांगत राहतात.

भूगोलच्या प्राध्यापकांनी पुस्तकातला भूगोल सप्तसागरात बुडवून, पोरांना बसल्या बसल्या साऱ्या दुनियेत कसं हिंडवून आणलं नि ही पृथ्वी आपल्या जिभेवरच कशी तरलीय ते सांगितलेलं.आपलेच पंख त्या तासाला कापल्यागत इथं चिंताग्रस्त होऊन सांगतात. कॉमर्सच्या तासाला रंगलेला 'काम रस' सांगायला बिचाऱ्या चिमण्या लाजतात. पोरींच्या घोळक्यातले पांचट विनोद सांगायला धजावत नसतात.

मानसशास्त्रावर तर्कशास्त्र आणि तर्कशास्त्रावर मानसशास्त्र कसं कुरघोडी करीत असतं, याचा वर्गात झालेला घोळ बिनतोडपणे सांगत राहतात. राज्यशास्त्राच्या तासातलं पॉलिटिक्स कसं चाललंय आणि ते शिकवणाऱ्या प्राध्यापकाच्या नजरेतलं राजकारण कोणत्या लाईनवर आहे हे बावरलेल्या चिमण्या खासगीतलं गुपित सांगावं तसं सांगतात. हळूच एकमेकीला चिमटा काढतात. कधी घामाघूम होऊन येतात. त्यांच्या तोंडातून शब्दच फुटत नसतात. मग इकडचा-तिकडचा कानोसा घेऊन कानाशी लागतात, बघा तरी ग्रंथालयात जाऊन, 'श्रीमान योगी' 'वय वर्ष सोळा'ला मी तुझाच 'स्वामी' म्हणून 'विडा रंगला ओठी' चं गुपित सांगत बसलाय, असं ग्रंथालयातून धावत आलेल्या चिमण्या'कट्यार काळजात घुसल्या' सारखं बोलत राहतात. मला त्या घाबऱ्याघुबऱ्या झालेल्या चिमण्यांना पाहून वाटतं, या 'वेड्यांचं घर उन्हात' बांधलं पाहिजे. त्यांना दटावलं तरी त्यांची नजर सांगते, 'अजब सारा प्रकार ! अजब... अजब. धन्य धन्य तू नरनारायण नटेश्वर.'

काही वेळ त्या कुठून आल्या असाव्यात हे त्यांच्या हालचालीवरून मला चांगलं कळतं. कधी कधी पारच संतुलन बिघडल्यासारख्या वागू लागल्या तर, मला वाटतं, त्या प्राचार्यांच्या खोलीचा वारा त्यांना लागला असावा. कधी इतका चिवचिवाट करतात की निश्चित जाणावं, यांना फिजिकल डायरेक्टरनं भडकवलं असावं. त्यांचं अष्टनायिकांच्यासारखं वागणं घडलं, तर बालंबाल

खात्री करावी की, कुणी संस्कृतवाला नजरेस पडला असावा. फारच धावतपळत आलेल्या दिसल्या की त्यांना कुणी नवकवी येताना दिसला असेल. कारण भाषेचे प्राध्यापक सोडून गणित, कॉमर्स, तर्कशास्त्र, पॉलिटिक्स, भूगोल या विषयांचे कवितेची नशा चढलेले प्राध्यापक ठेचेला आढळतात. त्यांच्या तावडीत सापडले की आपला 'इहलोक' संपला असंच समजावं. ज्या वेळी त्या झुरून बसल्यासारख्या बसतात, तेव्हा मनाशी खूणगाठ बांधतो की, हिंदीच्या प्राध्यापिकेच्या तासाला त्या बसून आल्या असाव्यात. फारच गोंधळ त्या पाहून आल्या असाव्यात. त्याचंच अनुकरण यांनी उचललं असावं. नुसताच चिवचिवाट. धावाधाव, फडफडाट.

खरं तर या चिमण्यांचंच हे मुलूख मैदान. कॉलेजचे तास चालू असले की यांच्या अंगातही कॉलेजच्या पोरापोरींचं वारं शिरलेलं असतं. पण एका तासाला बसतील तर शपथ. सारखी वेगवेगळ्या तासाची चव घेत नि चव बदलत हिरोळ्या घालत असतात. तशा त्या फारच हिंडुऱ्या बनलेल्या असतात. इथल्या वातावरणात त्यांचा चिवचिव वावर नसेल तर वातावरणाला कसलीच कळा येणार नाही. उन्हानं मान टाकून पडलेल्या, केळुसल्या वातावरणात मनच लागणार नाही. त्यापेक्षा स्मशान बरं. करड्या शिस्तीतली जीवघेणी शांतता मनाला उभारी देणारी नसते. चिमण्यांनी हा ताण कमी केलेला असतो.

मला तर या चिमण्यांची खूप सोबत. खूप आधार. त्या खिडकीत आल्या नाहीत, थोड्या नाचल्या नाहीत, चिवचिव केली नाही, तर मन मोडून जातं. दिवस काही प्रसन्न वाटत नाही. कधी त्यांनाही लहर येते. कहर करतात. त्या संपावर जातात. वातावरणातला प्राणच निघून गेल्यासारखे होते.

खिडकी, चिमण्या आणि मी यांचं एक नातंच जमलेलं होतं. त्या महाविद्यालयात पहिलं पाऊल ठेवलं तेव्हा कोणती गोष्ट जवळची वाटली असेल तर ती खिडकी. मी परका, नवखा. सारे अनोळखी. मी संकोचत खिडकीजवळच्या खुर्चीत बसलो. खुर्ची, तीही कोपऱ्यातील. कुणाचंही लक्ष जाणार नाही अशी ती कोपऱ्यातली जागा. लागूनच खिडकी. पहिल्या दिवशीच सारे कुणीतरी उपरा बसला आहे, या भावनेनं माझ्याकडं नजर टाकत. मला परकेपण लगेच जाणवे. जीव बावरून गेला. पण जेव्हा उघड्या खिडकीच्या सळयांवर चिवचिवत चिमण्या आल्या, बसल्या, नाचल्या, माझ्याकडं त्यांनी वळून वळून पाहिलं नि माझी-



त्यांची चटकन ओळख झाली. सलगी वाढली. ती खिडकी अन् त्या चिमण्या. माझं कोपऱ्यातल्या खुर्चीतलं विश्व उभं राहिलं.

त्या खुर्चीतच नवख्याचा जुनापाना झालो. त्या खिडकीशी रुळलो. चिमण्यांच्या चिवचिवाटानं दिवस सरले. महिने आले, गेले. वर्षा-वर्षाचं चक्र अनेक गंधपावलं उमटवीत सजलं. धुकधुकणारा जीव दमदार बनला. रुळून गेला. रुळता रुळता कधी हार मिळाले. कधी प्रहार मिळाले. मात्र जीवन संगतीतली तीच खुर्ची, तीच खिडकी... कोपऱ्यातली. कुणाच्याही नजरेत न सलणारी.

त्या खुर्चीनं मला खूप दिलं. त्या खिडकीनंही ओंजळ भरभरून पदरात ओतलं.

त्या कोपऱ्यातल्या खुर्चीतनं आख्खी स्टाफरूम दिसायची. प्रत्येक खुर्ची कशी वागते, कशी बोलते हे ध्यानी यायचं. कोणती खुर्ची किती खोल पाण्यात आहे हे समजायचं. कोणत्या खुर्चीची उंटाची चाल आहे हे कळायचं. अन् कोणत्या खुर्चीतल्या वजिराची चाल राजावर आहे हे ध्यानी यायचं. कोणती प्यादी हत्तीचा डाव रोखून धरतात हे उमगायला वेळ लागायचा नाही. या खुर्च्यांचा पंचवीस वर्षांचा सारीपाटाचा खेळ मी पहात होतो. ती खुर्ची 'सारे डावपेच पाहा नि विसरून जा' असा शहाणपणा शिकवायची. माझ्या खुर्चीनं खूप खूप शिकवलं.

म्हणूनच कोणत्या खुर्चीचं मायावी रूप आहे ते जाणवायचं. कोणत्या खुर्चीनं कोणता मुखवटा घातलाय तेही अवगत व्हायचं. कोणत्या खुर्चीच्या ध्यानी एक नि मनी एक आहे लक्षात येई. कोणत्या खुर्चीचा एक पाय तळ्यात नि एक पाय मळ्यात आहे ते दिसायचं. कोणत्या खुर्चीचे पाय मातीचे आहेत आणि कोणती खुर्ची हवेत तरंगतेय तेही दिसायचं. कित्येकदा अलीबाबा आणि चाळीस चोरांची आठवण होई. कधी बिरबल-बादशहाच्या गोष्टी स्मरायच्या. कधी इसापनीतीतल्या कथा गोंधळलेल्या मनाला आवर घालायच्या. कधी महाभारतातली सारीच्या सारी पात्रं वावरताना अनुभवायला यायचं. कित्येकदा वाल्या कोळीचा वाल्मिकी झालेला प्रत्यय यायचा. तर एखादा खुर्चीला खिळून बसलेला मुनी नारद आढळायचा, तर कुण्या खुर्चीतला कुणी कर्ण भूमीत रुतलेलं चाक वर काढता काढता अधिकच रुतत चाललेला दिसायचा.

तशी खुर्च्यांची नाना रुपं, नाना कल्पना, नाना विचार. तो एक शहाण्यांचा बाजार वाटायचा. नुसता कोलाहल. प्रत्येक खुर्चीचा रंग निराळा. आकार एकच. सांगाडा तोच, पण त्यात भरलेल्या नाना कळा. त्यांतली एखादी खुर्ची खट्याळ.

एखादी मिश्कील, पण नितळ निळ्या पाण्यासारखी. झरझर रुपेरी झरा वाहावा अशी. एखादा ढिम्म डोह. दुसऱ्याला ना अंत लागायचा. पण तशी फारच पोकळ. एखादी खैराच्या लाकडासारखी फुटता न फुटणारी. एखादी ओतीव पुतळ्यासारखी. नुसतेच डोळे हलणारी. या जगाशी ना देणं, ना घेणं. दुसऱ्याच्याच चोचीनं तोडता येईल तेवढी दुसऱ्याची आतडी तोडावीत. एखादी तर बिलोरी डोळ्यांची, नाचऱ्या नजरेची. उगाचच डोळ्यातल्या बाहुलीनं चाळा करणारी. मला तर वाटायचं. यांतल्या काही खुर्च्या तर नवथर, हसऱ्या, अजून या खुर्च्यांच्या या जगाची खरी ओळख न झालेल्या. सारी सर्कस इथं उतरलेली.

ज्याचा त्याचा वेगळा खेळ

ज्याचा त्याचा निराळा मेळ.

वेगळे तळ. वेगळे गट.

सर्वच बाजारातल्या माणसासारख्या. बाजारात असून बाजारात नसलेल्या. तरीही सगळा बाजारच विकत घेण्याची ईर्षा बाळगणाऱ्या. इतरांचा वाण तो कवडीमोलाचा अन् आपला म्हणजे पृथ्वीमोलाचा. एक गोष्ट मात्र खरी की इतके रंग आहेत म्हणूनच आपल्याही जीवनाला काही चव असते. आपल्याला काही अस्तित्व असतं.

एखादे दिवशी खुर्ची उदास दिसते. खिन्न दिसते. इथे चाललेल्या गोंगाटाच्या बाहेर असते. त्या वेळी मात्र माझं काळीज थरथरत राहायचं. एखादी खुर्ची किती मुग्ध असायची. त्या मुग्धपणातून रातराणीचा गंध दरवळत असल्यासारखा वाटायचा. एखाद्या खुर्चीचा वेडा जीव सर्व विकल्पाच्या पलीकडचा जाणवायचा. एखादी खुर्ची हातात तलवार घेऊन परजत असायची, पण तिच्या डोक्यावरची टांगती तलवार तिला दिसायची नाही.

एखाद्या खुर्चीचा उसासा ऐकून मनात कालवाकालव व्हायची. एखाद्या खुर्चीचं घर सततच उन्हात असलेलं पाहिलं की माझ्या पायाखाली सावलीसुद्धा उरत नसे.

अन् ती एक खुर्ची. जिवाला चटका लावून गेलेली. अगदी माझ्या खुर्चीला लागून असलेली. अबोल-शांत-समंजस. रोज आतल्या आवाजात काहीतरी एक-दोन शब्दात विचारायची. मी अंतर्मुख व्हायचो. ती खुर्ची कुणाच्या डोळ्यात सलत नसे. कुणाच्या डोळ्यात भरतही नसे. पण तिचं अबोलपण सर्वांना आदर



वाटावं असं होतं. ना कुणाचं मन दुखवणं. आपलं काम भलं. आपण भलं. सोपवलेलं कामही केव्हा केलं कळायचं नाही. मनात आलं की तेवढंच चांदणीसारखं गालातल्या गालात हसायचं. ते हसणं तरी किती निर्मळ, किती लख्ख. सतत आत्ममग्न आत्मा. त्या दिवशी सकाळीच चहाच्या सुट्टीत बर्फी आणि वेफर्सची प्लेट सर्वांना देण्यात आली. नेहमीप्रमाणे सर्वांचं खाणं चाललं होतं. बर्फीवरून स्टाफरूममध्ये मिश्कील विनोदही झाले. ही खुर्ची मात्र आज फारच आत्मतंद्रीत होती. कधी नव्हे ती माझ्या प्लेटमधील बर्फी त्या खुर्चीनं उचलली अन् मला त्या तंद्रीत म्हणाली, ''आज मला तुमच्या प्लेटमधील तुमची बर्फी हवी आहे.''

मला आश्चर्य वाटले. इतकी वर्षं सरली. मी कित्येकदा माझ्या प्लेटमधील काही असेल ते देऊ करायचा. पण त्या खुर्चीनं कधीच घेतलं नव्हतं. मन दाखवलं नव्हतं. अन् आज स्वत:हून मला न विचारताच बर्फीचा तुकडा उचलला होता. तोंडात टाकला होता. इतक्या वर्षानंतर का होईना माझ्या प्लेटमधलं खाल्लं याचा आनंद मला झाला होता. ती खुर्ची मात्र थोडी हळवी झालेली आज दिसत होती.

कॉलेज सुटलं की, मी बस पकडे. हे नित्याचं. मी बस स्टॉपकडं जात होतो. एवढ्यात ती खुर्ची आडवी आली. मला म्हणाली,

''सर, चला तुम्हाला घरी सोडतो.''

आज एकावर एक धक्के बसत होते. नवल वाटलं. मी खूष झालो. त्या खुर्चीनं अगदी अलगद स्कूटरनं घरी सोडलं. सोडून जाताना म्हणाली, ''तुम्ही आज स्कूटरवर बसला माझ्या. खूप बरं वाटलं.'' फरकन स्कूटर निघून गेली. मी पाहातच राहिलो. जेवण केलं नि आजच्या घडलेल्या अघटिताचा विचार करीत पडलो होतो. तेवढ्यात एक सहकारी धावत आले नि घामाघूम होत म्हणाले,

''सर, उठा उठा. भयंकर घडलं.''

''काय झालं ?'' मी अधीरतेनं विचारलं.

''...सरांनी आत्महत्या केली.''

''आत्महत्या ? कशानं ?''

''रॉकेल ओतून पेटवून घेतलं.''

''बाप रे ! भयंकरच.''

मला चरकन चरका बसला. आभाळ कोसळलं होतं. मी स्तंभित झालो. आतल्या आत गदगदून गेलो. इवलीशी गोजिरवाणी मुलं. सोन्यासारखी बायको. सोन्यासारखा संसार. नजर लागावी अशी ही नाती; पण अदृष्टाची दृष्ट लागलीच. असं कसं झालं ते बायकोलाही कळलं नाही. हे सारं गूढ. पण इतकी वर्षे एकत्र घालवूनही हा हिमनग कुणालाच कळला नाही. मलाही नाही. सुन्न झालो.

कुठे कधी बर्फी दिसली की माझे डोळे अंधारून येतात. मी त्यानंतर आयुष्यात बर्फी वर्ज्य केली, ती कायमचीच. काळीज करपलं ते कायमचंच.

तापल्या सळीचा चरका काळजाला बसला होता. माझ्या खुर्चीनं हे दु:ख खूप दिवस सोसलं. मनातून हलतच नव्हतं. त्या गूढ ओझ्याखाली जीव गुदमरायचा. किती दिवस हळहळ करायची.

हे असं घडतं तेव्हा मनावरचा ताण असह्य होई. एकेका खुर्चीच्या आयुष्यात काहीतरी घडेच. तेव्हाही मला माझ्या कोपऱ्यातल्या बसण्याचा उपयोग होई. मनातल्या कढांना वाव मिळे. उघड्या खिडकीतनं बाहेरच्या निळ्या आकाशाकडं पाहात राही. उंच उंच निळाईवर नभात मन खिळून जाई. केव्हा केव्हा आतल्या जगातल्या काही घटनांनी मन उद्वेगून जाई. तेव्हाही या खिडकीनं खूप आधार दिला. बाहेरच्या जगात गुंतून जाई. अंत:करणात गोठून राहिलेला व्यथेचा ढग आतल्याआत फुटून जाई. डोळ्यांच्या कडा ओलावून जात.

बाहेरच्या उन्हात तापणारा निसर्ग विश्वासू वाटे. वादळवाऱ्यात झोडपून निघूनही मातीशी इमान राखणारा झाडझाडोरा प्रामाणिक वाटे. भयंकर विजांच्या कडकडाटातही जराही न डगमगणारी इवलीशी रोपंही साथसंगत न सोडता एकनिष्ठ वाटत. हवी तर वीज कोसळो, नाहीतर जीव करपून जाओ. लांब आकाशात भरारत जाणारी पाखरं माझ्या मनाला ओढ लावीत. बाहेरच्या आषाढ पावसात मी स्वत:ला त्यात विरवून घेत असे. माझं या आतल्या जगातलं अस्तित्वच पुसून टाकी. वीज-वाऱ्यात मिसळून जाई. कसं हलकं हलकं वाटे.

मनाचा जिप्सी होई. कुठे कुठे हिंडून येई. शिवारातल्या पोपटांच्या थव्यात मिसळे. काळ्या गवताचे कुरण तुडवत जाई. पावसात गुडघा गुडघा चिखलात भातभांगलणी करणाऱ्यांतला मी एक होई. भर उन्हात कुळव, पाट्यांचं औत चालवताना बैलांना गीत गाणारा औत्या होई. गावाकडचे डोंगर, खोल दऱ्यातला बहिरी ससाणा होई.



या खिडकीजवळच्या खुर्चीनं खूप खूप दिलं. महाभारताच्या रणक्षेत्राच्या वेळी खिडकीत बसलेल्या संजयला जसं सारं सारं दिव्यदृष्टीनं दिसे, तसं या खिडकीतनं दूर निळ्या नभाखालचा गाव मला रोज दिसे. तिथलं सगळं निष्पाप जग मला रोज भेटे. मी इथं स्टाफरूममध्ये शरीरानंच असे, पण अंत:चक्षूंनी मनादेहानिशीही मी त्या बाहेरच्या जगात असे. मग आतलं कसलंही किल्मिष मनाला शिवत नसे, डसत नसे. सारे लेप खळाखळा निखळून पडत.

समाधी अवस्थेचा क्षण यापेक्षा वेगळा नसेल काही !

त्या तंद्रीतलं अंत:करणात फाकलेलं मंद तेज काही वेगळं नसावं.

माझे सहकारी मात्र भले होते. त्यांना याचा मत्सर कधीच वाटायचा नाही. माझी तंद्री भंग पावायचे नाहीत. हे माझं जगणं त्यांना बरं वाटायचं. आदर करीत. मी नसलो तर त्या खुर्चीत कुणीच बसत नसे. ती तशी मोकळी ठेवीत. परकं कुणी बसू लागलं तर त्याला ते सांगत,

''ही सरांची खुर्ची आहे. तिथं बसायचं नसतं.''

बसलेल्या माणसाला उठवल्याशिवाय माझ्या सहकाऱ्यांच्या मनाला बरं वाटत नसे. इतका लोभ सर्वांनी लावला.

मीही त्या खिडकीशी कधी प्रतारणा केली नाही. उन्हाळ्यात पूर्वेच्या सूर्यकिरणांचा प्रखर झोत माझ्या त्या खुर्चीवर यायचा. चटका बसला तरी मी ती खुर्ची सोडून बाजूला बसलो नाही, की त्रास होतोय म्हटलं नाही. त्या खिडकीतून थंडीच्या दिवसात थंडीचे लोट येत. रक्त गोठून जाई. कधी बर्फगार वारा अंगभर कळा उठवी. पण तरीही त्या कळांना भिऊन खिडकी सोडली नाही. कधी जोराच्या पावसाची झड अंगावर येई. कधी वादळाचा झोत आत लोटे. पण सारं सारं मी व्रतस्थासारखं सहन केलं.

कधी वरच्या मजल्यावरून टाकलेला केरकचरा खिडकीतून येई. अंग माखून टाकी. हे सारं घडलं तरी मी खिडकीशी अनादरानं वागलो नाही. त्या खुर्चीत नि त्या खिडकीतील कोपऱ्यात बसणं म्हणजे दिव्य असायचं. पण मी चळलो नाही. ढळलो नाही. जणू तिथं बसणं ही तपश्चर्याच ठरायची. तप:भंग करण्यासाठी नाना अरिष्टं ऋषीमुनींच्यावर येत, तशीच ही अरिष्टं माझी सत्त्वपरीक्षा पाहात. पण माझा विश्वामित्र कधीच झाला नाही. भुंग्यांनी मांडी फोडली तरी मांडीवर घेतलेल्या गुरूंच्या डोकीला त्याची कल्पनाही येऊ न देणाऱ्या त्या क्षत्रिय वीरासारखी माझी

अवस्था होत असे. पंचवीस वर्षांच्या काळात एक दिवसही मी अन्य खुर्चीच्या मोहात अडकलो नाही, की थंडीवाऱ्यात, ऊनपावसात उबाऱ्याची जागा मोह घालू शकली नाही.

आयुष्याचे चढ-उतार त्या खिडकीनं पाहिले. सुखदु:खाची सोबत केली. अनेक मानसन्मान त्या खिडकीनं मला दिले. जिवलग सहकाऱ्यांचं निरागस असं प्रेम दिलं. खिडकीनं जे दिलं त्याला कुबेरही अपुरा पडला असता. कर्णासारखा मृत्युंजयी दाताही हरला असता.

मी त्या कोपऱ्यात, त्या खुर्चीत, त्या खिडकीत असलो की सर्वांना स्टाफरूम गच्च वाटे. आधार वाटे. पण ती खुर्ची रिकामी असली की स्टाफरूमलाच हुरहुर वाटे. काहीतरी हरवल्यासारखं वाटे. सहकारी अति प्रेमानं म्हणत,

''सर, तुम्ही त्या खुर्चीत असला की स्टाफरूम गच्च भरल्यासारखी वाटते. तुम्ही नसला की सारं रिकामं वाटतं.''

माझी सेवानिवृत्ती जवळ आली. माझं अंत:करण विद्ध होऊ लागलं. कायमच्या होणाऱ्या वियोगाच्या कल्पनेनंच थरारून जाऊ लागलं. दोन तपांपेक्षा जास्त काळ या खिडकीनं सुखाचा दिला. अनेक वेळा अंधारलेल्या मनाला उजळ केलं. माझ्या उरीचं स्वप्न तिनं पाहिलं होतं. तीच या स्वप्नांची खरीखुरी साक्षीदार.

स्वप्नपूर्तीच्या झगड्यात खिडकीनंच साथ दिली. माझे कढ सोसले. काळवंडून आलेल्या मळभांना तिनंच उधळून लावलं. बाहेरच्या आभाळाखालच्या जगाचं नवं नवं रूप दाखवलं. ऊन-सावलीच्या लपंडावाचं दर्शन घडवलं. वादळवाऱ्यानं उन्माळलेली झाडेही कशी उभी राहिली त्याचंही भान दिलं. खचल्या मनाला धीर दिला. वठू आल्या मनाला चैत्रपालवीचे नवे कोंब फोडले. दूरवरच्या डोंगरशिखरांचं उमदं जगणं शिकवलं. हिरव्यागार पानझडीचं उद्‌ध्वस्त होणं दाखवलं. त्यातूनच फुटलेल्या धुमाऱ्यांनी जगण्याची ताकद दिली.

फसव्या पायवाटांपासून सावध केलं.

पण आता ज्या विश्वाशी एकरूप होऊन गेलो होतो, ते विश्वच कायमचं सोडून जाणार या कल्पनेनं पायांतलं बळच गेलं. इथं या खिडकीजवळ आलो, या खुर्चीत बसलो की बाहेरच्या जगातले सारे ताणतणाव निथळून जात. राग-मोह विरघळून जात. हेव्यादाव्याची दावण गळून पडे. मी विदेही होई. रूपा-अरूपाच्या वाटा पुसल्या जात.



सेवानिवृत्तीच्या क्षणी गलबलून आलं. सेवा सत्काराच्या वेळी मला त्या खुर्चीतून उठावं लागलं, त्या क्षणी सारे बंध तुटले.

निरोप सोहळा संपला. सगळे जड पावलानं दूर झाले. माझा पाय निघत नव्हता. अखेरचं म्हणून त्या खुर्चीत बसलो. स्टाफरूमभर नजर टाकली. साऱ्या रिकाम्या खुर्च्या बघून अंत:करणाला एक सल डसत गेली. खुर्च्यांवरची जड नजर खिडकीच्या दिशेनं वळवली. मन भरून आलं, उठलो आणि खिडकीच्या सळ्यांना घट्ट पकडलं. अन् भरून आलेला हुंदका फुटला. नजरेसमोरचं सगळं पुसट पुसट होत गेलं. नेहमीच्या चिमण्या आजच कशा दिशापार झाल्या कळलंच नाही.

✦✦

# वाटसरू

खूप वर्षांनी निवांतपणा लाभला होता. एकदा पूर्वीचं जीवन जगावं असं सारखं वाटायचं. ते बालपण... बालपणीच्या त्या खोड्या... बालपणाच्या सवंगड्यांबरोबर केलेल्या रानामाळातल्या उनाडक्या... वेडं करणाऱ्या जत्रा - आणि त्या जत्रांना जाणाऱ्या माणसांनी फुलून गेलेल्या वाटा पुन्हा एकदा चालून पाहाव्यात, पुन्हा एकदा उघड्या आभाळातल्या त्या चांदण्या रात्रीच्या शांत नदीत उतरणाऱ्या नि सर्कशीच्या तंबूची ओढ लावणाऱ्या खाचखळग्यांच्या वाटांवरचा वाटसरू व्हावं असं सारखं मनात यायचं. पण जीवनाच्या धबडग्यात तसं होत नव्हतं. जमत नव्हतं. घडत नव्हतं.

पण आता वय उताराला लागलं. सारी कामंधामं आपापल्या मार्गी लागलीत. म्हणूनच माझा मार्ग मोकळा झाला होता. आता मस्त जगायचं. मनमुक्त हिंडाफिरायचं. पायाला चक्र बांधून मी तयारच होतो. वारं प्यालेल्या वासरागत माझी स्थिती झाली होती. त्या बांधाबांधावरच्या वाटा-आडवाटांनी उंडारत धावायचं होतं.



माझ्या शाळेसाठी माझा जीव फार तुटत होता. एकदा त्या पडव्यांच्या, गळक्या, अंधाऱ्या इमारतीत शाळा भरत होती ती पाहायची होती. मी माझ्या मित्राला तयार केलं. आम्ही दोघांनी त्या शाळेसाठी चिखल तुडवला होता. काट्यांनी पाय रक्ताळून टाकलं होतं. फुफाट्यानं अनवाणी तळवे करपून टाकले होते. उन्हानं भाजून काढलं होतं. झडीच्या पावसानं झोडपून काढलं होतं. थंडीनं तर रक्त आरपार गोठवून टाकलं होतं. त्या शाळेकडं त्याच वाटेनं जायचं असं मी ठरवलं होतं. त्या वाटेचा वाटसरू बनून जायचं होतं.

मी मित्राला म्हटलं,

''आपण मधल्या वाटेनं जाऊ.''

तो मला वेड लागल्यासारखं माझ्याकडं पाहू लागला. म्हणाला,

''सरकारी गाड्यांचे इतके ताफे जात असताना पायी जायचं ?''

''हो-फार काही लांब नाही. आणि वाट तर आपल्या पायाखालची !''

''आरं बाबा, वाटा राहिल्यात कुठं. सडका झाल्यात डांबरी !''

''पण समोरच्या अर्ध्या मैलावरच्या गावासाठी दहा मैलाच्या अंतराचा गरका कशासाठी ? एवढा वेढा घेण्यापेक्षा दोन पावलात जाऊ !''

''खुळा आहेस. लोक काय म्हणतील. कुणी जातं का चालत ? मला तर चालणं दोन पावलंसुद्धा जमायचं नाही. मुकाट जाऊ गाडीनं.''

झळझळत गाडी आली. मुसक्या बांधून बसवावं तसं वाटलं.

गाडीत ही गर्दी. जीव घुसमटून निघत होता. गाडीतल्या गुदमरण्यानं माणसं एकमेकावर कातवत होती. चिडत होती. कुणी तरी कुणावर तरी डाफरत होतं. पोत्यात बांधून मांजराला दूर सोडायला न्यावं तशी माझी गत झाली. श्वास घेणंही जमत नव्हतं. कुरबुरीशिवाय काही ऐकायला मिळत नव्हतं. जो तो त्या गर्दीतल्या दुसऱ्याकडं वैऱ्यासारखा धुमसत पाहात होता.

बाहेर एवढा मुलूख पसरलेला, पण काही म्हटल्या काही दिसत नव्हतं. एस.टी.चं खदखदणारं धूड बेगुमानपणे आचकं देत पळत होतं. काही बोलावं तर जवळच्या माणसाशीही धड काही बोलता येत नव्हतं.

नव्या जगानं सारंच बदलून टाकलं होतं.

'वाटसरू' ही कल्पनाच मोडीत काढली होती. पूर्वी कसं सुरेखशी पायवाट हितगुज करीत गावागवंड्याला आपल्याला न्यायची. वाटसरू गावात शिरला